# अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृह प्रवेशाबाबत सुचना

अकोला जिल्हयातील अल्पसंख्यांक समाजातील शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी अल्पसंख्यांक वसतीगृह योजनेअंतर्गत डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे मुलींचे वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गरजु व पात्र मुलींकडुन वसतीगृह प्रवेशाकरीता आवेदनपत्र मागविण्यात येत आहेत. सदर आवेदनपत्राचा नमुना तसेच वसतीगृहात प्रवेशाबाबतच्या इतर माहिती व सुचना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला चे संकेतस्थळ **www.pdkv.ac.in** वर देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी वेबसाईट वरून आवेदनपत्राचा नमुना डाउनलोड करून त्यातील संपुर्ण माहीती भरून आवश्यक कागदपत्रासह अधिष्ठाता (कृषि अभियांत्रिकी ) कृषि अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविघालय, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला येथे दि. ३०.११.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत हस्तपोच अथवा पोस्टाने पाठवावेत. पोस्टाने पाठविलेले आवेदनपत्र उशीरा मिळाल्यास प्रवेश गृहीत धरण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी आवेदकाची राहील.

आदेशान्वये

**-Sd-**

अधिष्ठाता
कृषि अभियांत्रिकी विद्याशाखा
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला